धावा

धाव धावरे धाव नाथा, येई लवकर ।
आम्हा दीनावर कृपा करावी, भक्ति सुख पार ॥ धृ. ॥

बहु जन्म दिवस गेले, आठवेना काही ।
मानव जन्मा आली आठवण, देवा तुझे पायी ।
बहु दुःखाने आम्ही पिडलो, कळेना आश्रय ।
निर्वाणीचा तूंच एक, आम्हा बाप-माय ॥ १ ॥ धाव धावरे..

करुनी - अकर्ता दयावंत, देवा तूंच राजा ।
तिन्ही लोकी गमन तुझे, येशी याच काजा ।
भक्तिभावे नाम मुखी, रंगी रंगु दे ।
सत्कर्माने सुख डोळा, चरण पाहु दे ॥ २ ॥ धाव धावरे..

आनंद ध्यानी आनंद मनी, आनंदी संसार ।
बुध्दि ज्ञान वैभव अंगी, तुझी कृपा थोर ।
अजन्माचा फेरा मिटण्या, छाया तुझी राया ।
सगुणरूपे भेट आम्हा, येऊ द्यावी दया ॥ ३ ॥ धाव धावरे..

मानव जन्मा पाप- पुण्य, तुझा अधिकार ।
गर्भवासी सुखी ठेवा, नाम निरंतर ।
संत - पायाची ओळख आम्हा, घडो सहवास ।
भक्तिमार्गे देह झिजवण्या, मना हिच आंस ॥ ४ ॥ धाव धावरे..

आत्मसुखाची दृष्टि दर्शविण्या, देवा तुझा भाव ।

सर्वांठायी एकरूप, सोहं तुझे नांव ।

जेथे तेथे तूच भरला, नामी विश्वंभर ।

पाहू जाता पाहू गेले, केले अमर ॥ ५ ॥ धाव धावरे..

विश्वनाथा ध्यान हृदयी, तुझा परिवार ।

नाथ दिगंबर नंगे स्वामी, दत्त अवतार ॥ ६ ॥ धाव धावरे धाव नाथा

येई लवकर आम्हा दीनावर कृपा करावी भक्ति सुख पार..